**महाराष्ट्र शासन**

**उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अकोट वन्यजीव विभाग, अकोट यांचे कार्यालय.**

**कार्यालय :- पोपटखेड रोड आकोट,जि. अकोला,पिन को.नं. 444101 ई-मेल -dcf.akot@yahoo.com ;dycfwlakot@mahaforest.gov.in**

# जाहिरात

आकोट वन्यजीव विभागाअंतर्गत, कंत्राटी पदे भरावयाचे असून, खालीलप्रमाणे कंत्राटी पदांकरिता अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कंत्राटी पदनाम | पद | मानधन रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | MS-CIT प्रशिक्षक (शहानूर संकुल येथील प्रशिक्षक केंद्राकरिता संगणक चालक व MS-CIT प्रशिक्षक) | 01 | @18000/- प्रती महा | करार 11 महिन्याच्या कालावधीसाठी आणि नंतर आवश्यतेनुसार वाढवता येईल. |

**किमान पात्रता :-** 1. कोणत्याही शाखा/विषयात पदवीधारक, संगणक शास्त्रातील पदवीधर यांना प्राधान्य दिले जाईल, MS-CIT अभ्यासक्रमाकरिता प्रशिक्षक म्हणून किमान तीन वर्षाचा अनुभव.
2. MS-CIT अनिवार्य, मराठी टंकलेखन ३० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी टंकलेखन ४० शब्द प्रति मिनिट.
3. वनविभागात काम करण्याचा पूर्वीचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

**कामाचे स्वरुप :-** 1. विद्यार्थ्यांना एमएससीआयटी अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देणे व वेगवेगळ्या पोर्टलवर डेटा एंट्री करणे.
2. वनअधिकारी यांचे सुचनेनुसार डाटा एंट्री, टंकलेखन कामे, ईतर अनुषांगीक कामे.
3.सदरहु कार्यक्रम कार्यकारी संचालक, मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठाणव्दारे संचालित असून, आवश्यकतेनुसार मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील ईतर कार्यक्षेत्रात काम करणे अपेक्षित आहे.

**कामाचे ठिकाण :-** शहानुर संकुल, ता.अकोट,जि.अकोला.

| अ.क्र. | कंत्राटी पदनाम | पद | मानधन रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|
| 2 | MSTrIPES डाटा एंट्री ऑपरेटर | 02 | @18000/- प्रती महा | करार 11 महिन्याच्या कालावधीसाठी आणि नंतर आवश्यतेनुसार वाढवता येईल. |

**किमान पात्रता :-** 1. कोणत्याही शाखा/विषयातील पदवीधारक, अनुषांगीक क्षेत्रात काम केल्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव. GPS/GPRS/IT तज्ञ तसेच संगणक शास्त्रातील पदवीधर यांना प्राधान्य दिले जाईल,
2. MS-CIT अनिवार्य, मराठी टंकलेखन ३० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी टंकलेखन ४० शब्द प्रति मिनिट.
3. वनविभागात काम करण्याचा पूर्वीचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

**कामाचे स्वरुप :-** 1. वनअधिकारी यांचे सुचनेनुसार, MSTrIPES कार्यक्रम मधील माहिती (डेटा) संकलन, रचना आणि विश्लेषण करणे तसेच डाटा एंट्री, टंकलेखन कामे, ईतर अनुषांगीक कामे.
2. MSTrIPES कार्यक्रम ग्लोबल पोझिशनिंग सिस्टम (GPS), जनरल पॅकेट रेडिओ सर्व्हिसेस (GPRS) आणि रिमोट सेन्सिंगचा वापर करतो, ज्यामुळे माहिती गोळा केली जाते, आधुनिक माहिती तंत्रज्ञान (IT) आधारित साधनांचा वापर करून डेटाबेस तयार केला जातो, GIS आणि सांख्यिकीय साधनांचा वापर करून माहितीचे विश्लेषण केले जाते जेणेकरून अनुमाने दिली जाऊ शकतात ज्यामुळे व्याघ्र प्रकल्प व्यवस्थापकांना त्यांच्या वन्यजीव संसाधनांचे अधिक चांगले व्यवस्थापन करता येते. त्यानुसार MSTrIPES कार्यक्रमातील तांत्रिक कामे
3. सदरहु कार्यक्रम कार्यकारी संचालक, मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठाणव्दारे संचालित असून, आवश्यकतेनुसार मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील ईतर कार्यक्षेत्रात काम करणे अपेक्षित आहे.

**कामाचे ठिकाण :-** आकोट वन्यजीव विभाग, आकोट.

| अ.क्र. | कंत्राटी पदनाम | पद | मानधन रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|
| 3 | माजी सैनिक (व्याघ्र संरक्षण दल/ फिरते पथक/ विशेष सेवा किंवा ईतर संरक्षणकामी) | 10 | @16000/- प्रती महा | करार 11 महिन्याच्या कालावधीसाठी आणि नंतर आवश्यतेनुसार वाढवता येईल. |

**किमान पात्रता :-** 1. भारतीय सशस्त्र दलांमध्ये (लष्कर, नौदल, हवाई दल, ई.) सेवा करून निवृत्त झालेल्या व्यक्ती/माजी सैनिक.
2. वनविभागात काम करण्याचा पूर्वीचा अनुभव असलेले गतिमान, प्रतिभावान तसेच स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.
3. कमाल वयोमर्यादा ६0 वर्षे असेल.

**कामाचे स्वरुप :-** 1. स्थानिक वन अधिका-यांचे नियंत्रणाखाली राहुन त्यांचे आदेशानुसार वन व वन्यजीव संरक्षणविषयक कामे, जसे-दैनंदिन पायदळ गस्त, ईत्यादी.
2. वेळप्रसंगी जंगलातील तात्पुरत्या संरक्षण कुटीवर मुक्कामी रहावे लागेल. निश्चीत केलेला गणवेश व शस्त्रासह त्यांना व्याघ्र प्रकल्पाचे नियमाचे पालन करावे लागतील.
3. आवश्यकतेनुसार मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील ईतर कार्यक्षेत्रात काम करणे अपेक्षित आहे.

**कामाचे ठिकाण :-** आकोट वन्यजीव विभाग, आकोट.

1. वरील पदांसाठी अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांनी त्यांची स्वाक्षरी केलेला बायोडाटा (Resume) व पदांकरिता आवश्यक असणारे सर्व कागदपत्रे PDF Format मध्ये एकाच फोल्डर मध्ये dcf.akot@yahoo.com या ईमेल आयडी वर मेल करावे किंवा उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अकोट वन्यजीव विभाग, अकोट यांचे कार्यालयात दि. 20/11/2025 पर्यंत सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत पोस्ट किंवा स्वहस्ते/दुता मार्फत पोहचवावे.
   अर्ज स्विकारण्याचा पत्ता :- उपवनसंरक्षक,अकोट वन्यजीव विभाग, अकोट, पोपटखेड रोड, आकोट, जि.अकोला पिन को.नं. 444101
   ई मेल आय.डी. : - dcf.akot@yahoo.com संपर्क अधिकारी :- श्री.ए.एम. तराळे, भ्र.क्र.-9960846080.
2. उमेदवारांनी कागदपत्रे सादर करतांना मोबाईल क्रमांक नमुद करावा; जेणेकरुन, या कार्यालयाव्दारे उमेदवारास आवश्यक सुचना कळविण्यात येईल. **सदर कंत्राटी पदाकरिता ईच्छुक उमेदवारांनी मुलाखतीकरिता दि.25/11/2025 रोजी सकाळी 11.00 वा. उपवनसंरक्षक, आकोट वन्यजीव विभाग, आकोट यांचे कार्यालय (पत्ता- पोपटखेड रोड, आकोट, जि.अकोला) येथे हजर रहावे.** एखादी बाब किंवा अपूर्ण माहिती लक्षात घेता अथवा ईतर कोणत्याही कारणास्तव कारण न दर्शविता उमेदवारास नाकारण्याचा अधिकार निवड समितीने यांनी राखुन ठेवला आहे.

**राहुल सिंह टोलिया (भा.व.से.)**
**उपवनसंरक्षक,**
**मेळघाट व्याघ्र प्रकल्प,**
**आकोट वन्यजीव विभाग, आकोट**